# लोकमंगल विज्ञान व उद्योजकता महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय एकता दिवस साजरा

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान वडाळा संचलित लोकमंगल विज्ञान व उद्योजकता महाविद्यालयामध्ये दि 31.10.2022 रोजी भारताचे लोहपुरुष म्हणुन ओळखले जाणारे सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधुन राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला.

महाराष्ट्र शासन व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे कार्यक्रमाच्या सुरूवातीला राष्ट्रीय एकता दिवसाच्या शपथेचे सामुहिक वाचन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतिशकुमार देवकर हे अध्यक्ष म्हणुन उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. गौतम जाधव यांनी केले. यावेळी केलेल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतिशकुमार देवकर यांनी लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचे देशाच्या स्वातंत्र लढ्यातील योगदान लक्षात घेऊन आजच्या तरुणांनी त्यांचा आदर्श घेणे गरजेचे असल्याचे नमुद केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व शपथेचे वाचन प्रा. समाधान कदम यांनी केले.

यावेळी माहाविद्यालयातील जैवतंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. किरण जगताप, उद्योजकता व वाणिज्य विभागाचे प्रमुख डॉ. अमोल गजधाने, प्रा अंकुश गोरट्याल, प्रा विनय सामलेटी, प्रा स्नेहा हगरगुंडगी, प्रा सुजाता देवकर, प्रा भारती जाधव, , प्रा. स्नेहल मठे. प्रा. शितल भोजणे लिपीक अर्चना गाडेकर आदि शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.









Lokmangal Science & Entrepreneurship College Wadala.

Principal
Lokmangal Science &
Entrepreneurship College,Wadala

Scanned with Oken Scanner